जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १६३ | रविवार, ४ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

# पुणे महापालिकेमध्ये भाजप–राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शीतयुद्ध!

## गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांवरून मोहोळ-पवारांमध्ये खडाजंगी

**संतोष मुंडे**




पुणे, ता. ३ : एकीकडे पुणे शहरात गुन्हेगारी वाढत असल्याची नागरिकांमध्ये तीव्र भावना आहे, तर दुसरीकडे आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना उमेदवारी देत असल्याचा आरोप-प्रत्यारोपांचा फड रंगताना दिसत आहे. दुसऱ्या पक्षाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला उमेदवारी दिली म्हणून आम्हीही दिली असा युक्तिवाद राज्यात काही नेत्यांकडून केला जात आहे. यामुळे पुण्यात राजकारण आणि गुन्हेगारी यांचे साटेलोटे असल्याची चर्चा पुणेकरांमध्ये होत असल्याचे दिसून आहे.

या मुद्द्यावरून राजकारण तापले असून राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री तथा भाजप नेते मुरलीधर मोहोळ यांच्यात जोरदार शाब्दिक संघर्ष सुरू झाला आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भाजपची थेट आमने-सामने ठाकले आहेत. यामुळे महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत टीकेची धार अधिक तीव्र झाली आहे.

अलीकडेच पुण्यात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना उमेदवारी दिल्याचा आरोप करत भाजप नेते मुरलीधर मोहोळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर निशाणा साधला होता. यावेळी भाजपने हत्येचे आरोप असलेल्या रोहिदास चोरघे यांच्या पत्नी प्रतिभा चोरघे यांना उमेदवारी दिली आहे. ही उमेदवारी त्यांना का दिली? असा सवाल उपस्थित झाल्यानंतर मोहोळ यांनी पलटवार करत अजित पवारांकडे बोट दाखवले.

मंत्री मोहळ म्हणाले, एकीकडे पालकमंत्री पुणे गुन्हेगारीमुक्त होण्याची भाषा करतात, तर दुसरीकडे शहराच्या पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत विविध भागात त्यांच्या (अजित पवारांच्या) उमेदवारांची यादी पाहिली तर ते कोणत्या तत्त्वात बसते? असा सवाल मोहोळ यांनी उपस्थित केला. तसेच गुंड आंदेकरांच्या घरात उमेदवारी दिल्याचा उल्लेख करत त्यांनी अजित पवारांवर निशाना साधला.

या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना अजित पवार यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली यांनी रस्त्यांची सगळी वाट लावली आहे. शहरातल्या अनेक रस्त्यांवर अतिक्रमण झाले असून तिथे हफ्तेखोरी सर्रास सुरू आहे. गेल्या नऊ वर्षांच्या भाजपच्या सत्ताकाळात असा विकास झाला आहे का? असा सवाल करत त्यांनी थेट आरोप केले. तसेच ते म्हणाले टेंडरमध्ये टक्केवारी केली जाते, दादागिरी होते. मी पुरावे देतो, पुराव्यांशिवाय मी असं बोलणार नाही, असे म्हणत पवारांनी भाजपवर गंभीर आरोप केले.

एवढंच नाही तर अजित पवारांनी शहरातल्या एका व्यक्तीला विदेशात पळून जाण्यासाठी कोणी मदत केली, पासपोर्ट कोणी मिळवून दिला आणि तो कसा पळून गेला, याची चौकशी करण्याची मागणी केली. पवारांनी नाव न घेता निलेश घायवळ प्रकरणाचा उल्लेख केला. भाजपने गेल्या काही वर्षांत कोणाकोणाला कशी उमेदवारी दिली, याचीही माहिती काढा, असे ते म्हणाले. दरम्यान, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या मुलावर गुन्हे दाखल असल्याच्या काँग्रेसच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना अजित पवार म्हणाले, गुन्हे दाखल असणे म्हणजे दोषी ठरणे नाही. माझ्यावर ७० हजार कोटींचे आरोप झाले होते, पण ज्यांनी आरोप केले आज त्यांच्यासोबतच मी बसतोय. असं वक्तव्य करत त्यांनी केवळ आरोपांवरून राजकीय निष्कर्ष काढू नयेत, असा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर पुण्यातील राजकारण तापले असून, गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांवरून सुरू झालेला हा संघर्ष पुढील काळात आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## संक्षिप्त

### कवठे येमाई येथील अपघातात तरुणाचा मृत्यू

**शिरूर, ता. ३ :** अष्टविनायक महामार्गावर उस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या मागील ट्रॉलीला धडक लागून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही घटना कवठे येमाई (ता. शिरूर) येथे शुक्रवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. कपिल किशोर वारे (वय २४ , रा. लाखणगाव, ता. आंबेगाव) असे जागीच मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अष्टविनायक महामार्गावर उस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीचे चाक पंक्चर झाल्यामुळे ट्रॅक्टर चालकाने ट्रॅक्टर रस्त्यावरच थांबवले होते. रस्त्यावरून प्रवास करणारे कपिल किशोर वारे यांची धडक उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला बसली. दरम्यान, या अपघातात किशोर वारे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली व त्यांचा जागीच मृत्यू झाला. यात त्यांची मोटारसायकलही नुकसानग्रस्त झाली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांची सुपारी देऊन हत्या, आरोपीला अटक

**पुणे, ता. ३ :** खोपोलीतील माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांच्या खून प्रकरणातील पसार आरोपीला वानवडी पोलिसांनी अटक केली. हांडेवाडी भागात ही कारवाई करण्यात आली. आरोपी आणि त्याच्याबरोबर असलेल्या दोन मित्रांनी काळोखे यांची सुपारी घेऊन खून केल्याची कबुली दिली.

खालीद खलील कुरेशी (२३, रा. सय्यदनगर, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. खोपोलीतील माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांचा खून करण्यात आला होता.

हडपसरमधील रामटेकडी औद्योगिक वसाहतीत एका ज्येष्ठ नागरिकाला मारहाण करुन त्यांच्याकडील सोन्याची चैन हिसकावण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता.

दरम्यान, याप्रकरणात उमर नूर खान, साहिल हबीब फकीर यांना अटक करण्यात आली होती. दोघांची चौकशी करण्यात आली. तेव्हा आरोपी खालीद कुरेशी हा गुन्हा करुन पसार झाल्याची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर पोलिसांनी खालीद कुरेशीचा शोध सुरू केला होता. आणि मोठ्या शिताफीने आरोपीला बेड्या ठोकल्या.

# उजनी धरण संपादित व पाणलोट क्षेत्रातील अतिक्रमणांवर प्रशासनाकडून धडक कारवाई

**सागर जगदाळे**



भिगवण, ता. ३ : इंदापूर तालुक्यातील भिगवण परिसरात उजनी धरणाच्या संपादित व पाणलोट क्षेत्रातील बेकायदेशीर अतिक्रमणांवर जलसंपदा विभागाकडून कडक कारवाई करण्यात आली. उजनी जलाशयाच्या भूसंपादन क्षेत्रात अतिक्रमण करून काहींनी वीटभट्या, घरे तसेच व्यावसायिक स्वरूपाची दुकाने उभारली होती. याबाबत वेळोवेळी नोटीसा देऊनही अतिक्रमण हटविण्यात न आल्याने आज शनिवारी (दि. ३) रोजी धडक कारवाईला सुरुवात करण्यात आली.

अधिक माहितीनुसार, भिगवण-राशीन रोडलगत जुन्या भिगवण गावठाणाजवळ ही कारवाई करण्यात येत असून, या कारवाईत वीटभट्या, घरे तसेच दुकाने पाडण्यात आली. उजनी धरणाच्या संपादित क्षेत्रातील वाढती अतिक्रमणे पाणी साठवण क्षमता, जलव्यवस्थापन आणि सुरक्षिततेस धोका निर्माण करणारी असल्याने जलसंपदा विभागाने कठोर भूमिका घेतल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. दरम्यान, या अतिक्रमणांबाबत यापूर्वीही कायदेशीर कारवाई करण्यात आली होती. गतवर्षी जलसंपदा विभागाच्या पळसदेव भीमा उपसा सिंचन शाखेचे उपविभागीय अभियंता नितीन मधुकर खाडे यांच्या फिर्यादीवरून भिगवण पोलीस ठाण्यात अतिक्रमणप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. खाडे यांनी भिगवण पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करून संबंधितांवर कायदेशीर कारवाईची मागणी केली होती. मात्र, गुन्हा दाखल होऊनही अतिक्रमणांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आल्याने अखेर प्रशासनाने थेट धडक कारवाईचा निर्णय घेतल्याचे अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले.

उपलब्ध मालमत्तेचे जास्त नुकसान होऊ नये तसेच अनावश्यक तोडफोड टाळण्यासाठी यापूर्वी संबंधित अतिक्रमणधारकांना नोटीसा देऊन अतिक्रमण स्वखर्चाने हटविण्यासाठी आठ दिवसांची मुदत देण्यात आली होती. मात्र, दिलेल्या मुदतीत अतिक्रमण न हटविल्याने आज प्रत्यक्ष कारवाई करण्यात आल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. उजनी धरण हे राज्यातील महत्त्वाचे जलसाठा प्रकल्प असल्याने त्याच्या संपादित व पाणलोट क्षेत्रातील अतिक्रमणांवर पुढील काळातही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत जलसंपदा विभागाकडून देण्यात आले आहेत.

# सोशल मीडियावरचं एक 'स्टेटस' तुमची नोकरी घालवू शकते? निवडणूक आयोगाचा इशारा




**पुणे, ता. ३ :** पुणे शहरात महापालिका निवडणुकीचे वातावरण तापू लागले असून राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर शासकीय कर्मचाऱ्यांनी विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. निवडणुकीच्या उत्साहात अनेक वेळा शासकीय कर्मचारी आवडत्या नेत्याच्या किंवा पक्षाच्या प्रचारात सहभागी होताना दिसतात. मात्र सरकारी सेवेत असताना राजकीय तटस्थता राखणे बंधनकारक असून, त्याकडे दुर्लक्ष केल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की सोशल मीडियावर टाकलेला एक स्टेटस, पोस्ट किंवा कमेंटही आचारसंहिता भंग ठरू शकते. अशा कृतीमुळे कर्मचाऱ्यांच्या वर्षानुवर्षांच्या सेवेला धोका निर्माण होऊ शकतो. निवडणूक काळात ड्युटीवर असो किंवा रजेवर, कोणत्याही उमेदवाराचा किंवा पक्षाचा उघडपणे पाठिंबा देणे नियमबाह्य आहे.

प्रचार म्हणजे केवळ सभेत भाषण करणे एवढाच मर्यादित अर्थ नाही. उमेदवाराच्या पदयात्रेत सहभागी होणे, कार्यालयात पक्षाची पत्रके वाटणे, निवडणूक कामात जाणीवपूर्वक दिरंगाई करणे किंवा एखाद्या पक्षाला अप्रत्यक्ष फायदा करून देणे, हे सर्व प्रकार प्रचारात मोडतात आणि त्यांना स्पष्ट बंदी आहे.

आचारसंहिता भंग सिद्ध झाल्यास लोकप्रतिनिधी कायदा १९५१ अंतर्गत कारवाई होऊ शकते. अशा प्रकरणात तत्काळ निलंबन, विभागीय चौकशी, वेतनवाढ रोखणे, पदोन्नती रद्द करणे किंवा गंभीर प्रकरणात नोकरी गमावण्याची वेळ येऊ शकते.

दरम्यान, सायबर सेल आणि जिल्हा प्रशासनाचे सोशल मीडिया मॉनिटरिंग सेल सक्रिय झाले आहेत. फेसबुक, इन्स्टाग्रामवरील राजकीय पोस्ट, व्हॉट्सप स्टेटस, उमेदवाराचे चिन्ह किंवा फोटो, राजकीय पोस्टवर समर्थन करणाऱ्या कमेंट्स, तसेच राजकीय ग्रुपचे डमिन असणे, हे सर्व पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाऊ शकते.

कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही हेच नियम लागू असून, आचारसंहिता भंग आढळल्यास त्यांचे कंत्राट तत्काळ रद्द केले जाऊ शकते. एखादा कर्मचारी प्रचार करताना आढळल्यास सी-व्हिजिल पवर फोटो किंव व्हिडीओ अपलोड करून तक्रार करता येते, तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारही दाखल करता येणार आहे.

# शेती आणि पीक कर्ज व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ



**मुंबई, ता. ३ :** महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी नववर्षाची सुरुवात दिलासादायक ठरणारी महत्त्वाची घोषणा राज्य सरकारकडून करण्यात आली आहे. शेती आणि पीक कर्जाशी संबंधित व्यवहारांवर लागणारे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा मोठा निर्णय सरकारने घेतला असून, याचा थेट फायदा लाखो शेतकऱ्यांना होणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती देताना सांगितले की, २ लाख रुपयांपर्यंतच्या शेती आणि पीक कर्ज व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. याबाबतचा अधिकृत आदेश महसूल व वन विभागाने जारी केला आहे.

आतापर्यंत शेतकऱ्यांना कर्ज घेताना करारनामा, गहाणखत, तारण, हमीपत्र, तसेच इतर कागदपत्रांवर मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. हा खर्च अनेक वेळा शेतकऱ्यांसाठी आर्थिक ओझे ठरत होता. विशेषतः अल्पभूधारक आणि मध्यम शेतकऱ्यांना कर्ज प्रक्रियेत अडचणी येत होत्या. शासनाच्या या निर्णयामुळे कर्ज घेण्याची प्रक्रिया सुलभ होणार असून, शेतकऱ्यांचा अतिरिक्त खर्च वाचणार आहे.

महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, शेती हा निसर्गावर अवलंबून असलेला जोखमीचा व्यवसाय आहे. पावसाचे अनिश्चित स्वरूप, उत्पादन खर्च आणि बाजारातील दर यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत पीक कर्ज हे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र, कर्ज प्रक्रियेत होणारा अनावश्यक खर्च शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवत होता. ही बाब लक्षात घेऊन मुद्रांक शुल्क माफीचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयामुळे शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज मिळण्यास मदत होईल आणि ते खासगी सावकारांकडून कर्ज घेण्यापासून दूर राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. बियाणे, खते, औषधे, तसेच शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री खरेदीसाठी शेतकऱ्यांना आवश्यक भांडवल उपलब्ध होणार आहे.

या सवलतीचा लाभ राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका आणि ग्रामीण बँकांमार्फत घेण्यात येणाऱ्या शेती व पीक कर्ज व्यवहारांना मिळणार आहे. २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी आवश्यक असलेल्या सर्व संबंधित कागदपत्रांवर कोणतेही मुद्रांक शुल्क आकारले जाणार नाही.

# कुंजीरवाडी येथील तानाजी धुमाळ हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू

## शेवटच्या क्षणी दाखवलेल्या प्रसंगावधानाने अख्ख कुटुंब वाचलं

**विशाल कदम**



लोणी काळभोर, ता. ३ : देवदर्शन करून परतीच्या मार्गावर असताना अचानक छातीत त्रास होऊन कुंजीरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायतीचे माजी सदस्याचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (ता.१) घडली आहे. प्रसंगावधान राखत गाडी त्यांनी गाडी बाजूला घेतल्याने कुटुंब थोडक्यात बचावले आहे.

तानाजी उर्फ तुकाराम मुरलीधर धुमाळ (वय-५५) असे मृत्यू झालेल्याचे नाव आहे. तानाजी धुमाळ यांचे स्वताचे गणेश रोडलाईन ट्रान्सपोर्ट होते. व्यवसायाची राजकारणाशी योग्य सांगड घालून त्यांनी कुंजीरवाडी ग्रामपंचायतीच्या सदस्यापदाची धुरा देखील चांगली सांभाळली होती.

अतिशय हुशार, प्रेमळ, माणुसकी जपणारी व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती. परंतु, त्यांच्या अचानक निधनाने कुंजीरवाडी सह परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तानाजी धुमाळ हे कुटुंबासोबत देवदर्शनाखाली चारचाकी गाडीने परराज्यात चालले होते. प्रवासादरम्यान त्यांच्या अचानक छातीत वेदना सुरु झाल्या. त्यांनी ताबडतोब गाडी बाजूला घेतली. आणि ते गाडीतच बेशुद्ध होऊन कोसळले. त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना ताबडतोब जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र त्यांचा उपचारापूर्वीच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषित केले.

दरम्यान, तानाजी उर्फ तुकाराम धुमाळ यांच्या पार्थिवावर कुंजीरवाडी येथील स्मशानभूमीत शुक्रवारी (ता. २) शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे. एलआयसीचे अधिकारी ज्ञानेश्वर धुमाळ यांचे बंधू तर श्रीनाथ पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप धुमाळ यांचे ते चुलत बंधू होत.

### कुटुंब थोडक्यात बचावले

तानाजी धुमाळ यांना छातीत तीव्र वेदना होत असतानादेखील त्यांनी समयसूचकता दाखवून गाडी बाजूला घेतली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. तानाजी धुमाळ यांनी कुटुंबाला संकटातून सुखरूप बाहेर काढले. परंतु, तानाजी धुमाळ हे त्यांच्यावर आलेली वेळ वाचवू शकले नाहीत. आणि अखेर त्यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने जागीच मृत्यू झाला. त्यांच्या निधनाने परिसरातील नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त

### ओंकार साखर कारखान्याच्या राखेमुळे पिक खराब झाल्याची शेतकऱ्यांची तक्रार

**पुणे, ता. ३ :** ओंकार साखर कारखान्याच्या बॉयलर मधून निघणाऱ्या राखेमुळे परिसरातील पिकांचे नुकसान होत असल्याची तक्रार यवत ग्रामपंचायतकडे प्राप्त झाली असून याबाबत अधिक माहिती अशी की दौंड तालुक्यातील यवत येथे नुकताच सुरू झालेल्या ओंकार साखर कारखान्याच्या बॉयलरची राख ही फुल शेती असलेल्या दोरगेवाडी व परिसरात पिकांवर येऊन पिकेखराब होत चालली आहेत. अशी तक्रार परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी लेखी स्वरुपात यवत ग्रामपंचायत केली असून याबाबत त्वरित कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी बोलताना यवतचे ग्रामविकास अधिकारी बालाजी सरवदे म्हणाले की, दोरगेवाडी येथील शेतकऱ्यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाला असून याबाबत साखर कारखाना प्रशासनाशी पत्रव्यवहार केला जाईल. ओं कार साखर कारखाना व्यवस्थापक राजेश थोरात म्हणाले की,गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी अनुराज शुगर साखर कारखाना सुरू होता त्यावेळी असलेला बॉयलर सद्यस्थितीत सुरू असून कारखान्याची बॉयलरमधुन राख बाहेर जाणार नाही याची काळजी घेतली जाते तरी काही प्रमाणात राखेचे बारीक कण बाहेर जात असतील तरी याबाबत निश्चितच काळजी घेतली जाईल.

### लोकांच्या लक्षात 'व्हिलन'च राहतो : मुंडे

**बीड, ता. ३ :** चित्रपटात अनेकदा व्हिलन लक्षात राहतो, मात्र हिरो लक्षात राहत नाही, ही मानसिकता बदलायला हवी, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार धनंजय मुंडे यांनी केले. ते बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील एका विद्यालयात आयोजित कार्यक्रम त विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते. या कार्यक्रमात भाषण करताना धनंजय मुंडे यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारत एखादा हिंदी चित्रपट आठवतो का, असे विचारले. त्यावर विद्यार्थ्यांनी धुरंधर या चित्रपटाचे नाव सांगितले. त्यानंतर या चित्रपटातील नायक कोण आहे, असा सवाल त्यांनी केला असता विद्यार्थ्यांनी अक्षय खन्ना असे उत्तर दिले. यावेळी धनंजय मुंडे यांनी विद्यार्थ्यांकडे हात जोडत खंत व्यक्त केली. आजची परिस्थिती अशी आहे की चित्रपटातील व्हिलन जास्त लक्षात राहतो, पण हिरो लक्षात राहत नाही. ही मानसिकता समाजात बदलायला हवी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कठीण परिस्थितीतही आम्ही राजकारणात संघर्ष करत आहोत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### पोलीस बंदोबस्तात मनसे पदाधिकाऱ्याची अंत्ययात्रा

**सोलापूर, ता. ३ :** सोलापूर महापालिका निवडणुकीचा प्रचार सुरू होण्याआधीच शहर हादरवणारी घटना घडली आहे. भाजपमधील दोन गटात झालेल्या अंतर्गत वादातून एकाची हत्या झाली आहे. या रक्तरंजित घटनेमुळे संपूर्ण सोलापूरचं राजकीय वातावरण तापले आहे. शहरातील प्रभाग क्रमांक दोनमध्ये झालेल्या हाणामारीचा शेवट थेट खुनात झाल्याने, निवडणूक रणधुमाळीला हिंसक किनार मिळाली आहे. निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्यावरुन झालेल्या सोलापुरातील राड्यानंतर राज्यभरातील निवडणूक प्रक्रियेला गालबोट लागले आहे. उपचारदरम्यान मृत्यू झालेल्या सोलापुरातील मनसे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार पोलीस बंदोबस्तात करण्यात आले आहे.

# एमआयटी एडीटी विद्यापीठाला 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार प्रदान

**पुणे, ता. ३ :** डिफेन्स फोर्स लीग (डीएफएल) आणि डीआयएफटी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या सैन्याला समजावून घ्या या संकल्पनेवर आधारित आणि वॉल ऑफ हिरोज या जागतिक विक्रमी मोहिमेच्या अधिकृत शुभारंभासाठी आयोजित राष्ट्रीय स्तरावरील डिव्हाईन एव्हिएशन एज्युकेशन अँड कल्चर समिटमध्ये शिक्षणक्षेत्रातील उल्लेखनीय व दूरदृष्टीपूर्ण योगदानाबद्दल एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठ, पुणेला डीएफएलचा प्रतिष्ठेचा स्वॉर्ड ऑफ ऑनर पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान विद्यापीठाच्या विश्वस्त व कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड यांनी स्वीकारला.




या राष्ट्रीय परिषदेत माजी हवाई दल उपप्रमुख एअर मार्शल भूषण गोखले (पीव्हीएसएम, एव्हीएसएम, व्हीएम) यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अरुणाचल प्रदेश व मिझोरामचे सन्माननीय राज्यपाल तसेच इंडियन एअरलाइन्सचे माजी अध्यक्ष एअर मार्शल शशीकुमार रामदास (पीव्हीएसएम, एव्हीएसएम, व्हीएम, व्हीएसएम) यांचे विशेष मार्गदर्शन या कार्यक्रमात उपस्थितांना लाभले.

या प्रसंगी नागरी विमान वाहतूक उपमहासंचालिका श्रीमती सुवरिता सक्सेना, मिग२१ विमानावर सर्वाधिक उड्डाण तासांचा जागतिक विक्रम करणारे एअर कमोडोर सुरेंद्र त्यागी (वायुसेना पदक), तसेच भारताचे पहिले पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेते व पद्मश्री सन्मानित मुरलीकांत पेटकर हे मान्यवर उपस्थित होते. संरक्षण, शिक्षण, विज्ञान आणि संशोधन क्षेत्रातील अनेक नामवंत तज्ज्ञांनी परिषदेत सहभाग नोंदवला. एमआयटी एडीटी विद्यापीठाने उच्च शिक्षणात नवोन्मेष, कौशल्याधारित अभ्यासक्रम, संशोधन व उद्योगस्नेही उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर केलेल्या योगदानाची दखल घेत डीएफएलतर्फे हा विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. शिक्षणातून राष्ट्र उभारणीचा विचार प्रत्यक्ष कृतीतुन साकार करण्याची विद्यापीठाची भूमिका प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

परिषदेस प्रारंभी १९७१ च्या युद्धातील शहीदांसह भारतीय सशस्त्र दलातील वीर जवानांना पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी एअर मार्शल भूषण गोखले यांना एनसीसी कॅडेट्सकडून विशेष गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. याच मंचावर डीएफएल आणि डीआयएफटी फाऊंडेशनतर्फे भारतीय सैनिकांच्या शौर्यगाथांना समर्पित वॉल ऑफ हिरोज ही महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय मोहीम अधिकृतपणे जाहीर करण्यात आली.


विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि कार्याध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश कराड यांच्या नेतृत्वात एमआयटी एडीटी विद्यापीठाला मिळालेला स्वॉर्ड ऑफ ऑनर पुरस्कार हा विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था, सामाजिक बांधिलकी आणि देशहितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा गौरव असल्याची भावना यावेळी उपस्थितांमध्ये व्यक्त झाली.

### वन संरक्षण अधिकाऱ्याच्या लाच घेताना अटक

बुलढाणा, ता. ३ : अवैधपणे तोडलेल्या झाडांच्या वाहतुकीसाठी लाच घेतल्याप्रकरणी बुलढाणा येथील सहायक वन संरक्षक अधिकारी अश्विनी आपेट हिला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली आहे. या कारवाईत तिच्यासोबत लिपिक अमोल मोरे यालाही अटक करण्यात आली आहे. १५ हजार रुपये लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आल्याने वनविभागात खळबळ उडाली आहे. अश्विनी आपेट ही २०१६ बॅचची रेंज फॉरेस्ट ऑफिसर असून मागील वर्षीच तिला सहायक वन संरक्षक अधिकारी पदावर बढती मिळाली होती. ती सध्या बुलढाणा वनविभागात कार्यरत होती. वनविभागाच्या हद्दीत अवैधरित्या तोडलेल्या झाडांची वाहतूक करण्यासाठी तिने संबंधित व्यक्तीकडे ३० हजार रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत विभागाकडे करण्यात आली होती.

## हिंजवडीतील दोन स्पा सेंटर आणि लॉजवरील वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करण्यास यश

**पुणे, ता. ३ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात स्पा सेंटर आणि लॉजच्या नावाखाली सुरू असलेल्या अवैध वेश्याव्यवसायाच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. अशा गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून, सांगवी आणि हिंजवडी परिसरातील काही ठिकाणांवर थेट छापे टाकण्यात आले आहेत. या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांपासून सार्वजनिक ठिकाणांच्या आसपास स्पा आणि लॉजिंगच्या आड अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे येत होत्या. या माहितीच्या आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने नियोजनबद्ध कारवाई करत सांगवी आणि हिंजवडी परिसरातील दोन स्पा सेंटर आणि एका लॉजवर छापा टाकला. या कारवाईत संबंधित ठिकाणी अवैध वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे आढळून आले.

सांगवी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जी.एस. स्पा आणि ऑरा थाई स्पा, तर हिंजवडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अतिथी लॉजिंग अँड बोर्डिंग या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या तिन्ही ठिकाणांना एक वर्षासाठी सील केले आहे. यासोबतच संशयित महिलांना ताब्यात घेण्यात आले असून व्यंकटेश कोदंडबानी, अभिजित लॉरेन्स, प्रवीण बळीराम असटकर, युवराज राजेंद्र पाटील आणि राहुल चव्हाण उर्फ अमित यांच्याविरोधात संबंधित पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे हा अवैध प्रकार धार्मिक स्थळे आणि शैक्षणिक परिसराच्या जवळ सुरू होता. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण झाली होती. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याचा आरोप केला होता. अखेर पोलिसांनी ठोस पावले उचलत ही कारवाई केली.

दरम्यान, सांगवीतील गांगर्डेनगर आणि पिंपळे सौदागर भागातील काही स्पा सेंटर तसेच हिंजवडीतील विनोदे वस्ती परिसरातील लॉजमध्येही अशाच प्रकारे गैरप्रकार सुरू असल्याचे तपासात समोर आले. पोलिसांनी अशा ठिकाणांवर लक्ष ठेवून पुढील काळातही कठोर कारवाई सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

### राष्ट्रवादीच्या उमेदवाराच्या मुलाने वाटले पैसे; १४ जणांविरोधात गुन्हा

**पुणे, ता. ३ :** पुणे महानगरपालिका निवडणूक सध्या चांगलीच तापली असून प्रभाग क्रमांक ९ हा विशेष चर्चेचा विषय ठरत आहे. या प्रभागात एकामागून एक घडामोडी घडत असून राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. सुरुवातीला भाजपने माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांचे तिकीट कापून लहू बालवडकर यांना उमेदवारी दिली. या निर्णयामुळेच प्रभाग क्रमांक ९ मध्ये राजकीय हालचालींना वेग आला.

यानंतर आरोप आणि प्रत्यारोप सुरू झाले. आता याच प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारावर मतदारांना पैसे वाटप केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मतदारांना प्रभावित केल्याप्रकरणी बाणेर पोलिसांनी एकूण १४ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बाबुराव चांदेरे यांच्या मुलगा किरण चांदेरे याचाही समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

भाजपचे उमेदवार गणेश कळमकर आणि लहू बालवडकर यांनी आरोप केला आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे उमेदवार बाबुराव चांदेरे यांचा मुलगा किरण चांदेरे मतदारांना पैसे वाटत होता. हे प्रकरण समोर आल्यानंतर गणेश कळमकर यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधल्याचेही सांगण्यात येत आहे.

या प्रकरणानंतर बाणेर पोलिस ठाण्यात किरण चांदेरे यांच्यासह इतर १४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मतदार यादी बाळगणे, मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे आणि आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.



### इंदापुरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याची मागणी

आदित्य बोराटे

पुणे,ता. ३ : नगरपरिषदेत गेल्या अनेक वर्षांपासून कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत समाविष्ट करावे, अशी मागणी नगरपरिषदेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी नूतन नगराध्यक्ष भरत शहा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत देण्यात आलेल्या निवेदनानुसार, इंदापूर नगर परिषदेतील अनेक कर्मचारी गेल्या पंधरा वर्षांपासून नगरपरिषदेत कंत्राटी पद्धतीवर प्रामाणिकपणे काम करत असून, शहराच्या स्वच्छतेसह विविध नागरी सेवा सुरळीत ठेवण्यात योगदान देत आहेत. यासह इंदापूर नगरपरिषदेला स्वच्छतेबाबत देशपातळीवर मिळालेल्या विविध पुरस्कारांमध्ये या कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. असे असताना सध्या वाढत्या महागाईमुळे कंत्राटी पद्धतीने मि ळणाऱ्या तुटपुंज्या वेतनात कुटुंबाचा खर्च भागविणे कठीण होत आहे.

त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करावे. नगरपरिषदेमध्ये कायम सेवेत संधी दिल्यास पुढील काळात अधिक जोमाने व अखंडित सेवा देण्याची तयारी असल्याचे कर्मचाऱ्यांनी या निवेदनामध्ये नमूद करीत या मागणीची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती कर्मचाऱ्यांच्या वतीने केली आहे. दरम्यान या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषिमंत्री, तसेच इंदापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनाही पाठवली आहे.

## रेशन कार्डधारकांना आता पाच लाखापर्यंतचे मिळणार मोफत उपचार

**पुणे, ता. ३ :** गंभीर आजारपणाच्या काळात उपचारासाठी पैशांची चिंता कमी व्हावी, या उद्देशाने केंद्र सरकारने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार खासगी रुग्णालयांमध्ये मिळण्याची सुविधा देण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले आयुष्मान कार्ड काढताना अनेक अडचणी येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी दिसून येत आहे.

सध्या आयुष्मान कार्ड काढण्याची प्रक्रिया आयुष्मान महा ई-सेवा केंद्रांमार्फत राबवली जाते. मात्र या केंद्रांवर कार्ड काढण्यासाठी गेलेल्या नागरिकांना पहिल्याच टप्प्यावर अडथळे येत आहेत. अनेक ठिकाणी रेशनकार्ड आहे का, हा पहिला प्रश्न विचारला जात असून रेशनकार्डधारकांनाच कार्ड मिळेल, अशी भूमिका घेतली जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. त्यामुळे रेशनकार्ड नसलेले किंवा रेशनिंग प्रक्रियेत अडचणीत असलेले अनेकजण थेट योजनेपासून वंचित राहत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे काही नागरिकांकडे वैध रेशनकार्ड असूनही त्यांचे आयुष्मान कार्ड तयार होत नाही. ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणी, सर्व्हर डाऊन असणे, नावातील स्पेलिंगचा फरक, आधार क्रमांक किंवा इतर कागदपत्रांमधील तफावत यामुळे अर्ज वारंवार फेटाळले जात आहेत. परिणामी प्रत्यक्षात पात्र असतानाही अनेक गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळू शकलेला नाही.

ग्रामीण आणि निमशहरी भागातील नागरिकांसाठी खासगी रुग्णालयांमधील उपचारांचा खर्च परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत आयुष्मान योजनेचा आधार महत्त्वाचा ठरतो. मात्र आजारपणाच्या वेळी कार्डच उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासनाच्या या योजनेबाबत नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार आयुष्मान कार्ड काढण्यासाठी महा ई-सेवा केंद्रात वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. रेशनिंग नसेल तर कार्ड मिळणार नाही, असे सरळ सांगितले जात असल्याने अनेकजण निराश होऊन परत जात आहेत. सर्व पात्र नागरिकांना अडथळ्याविना आयुष्मान कार्ड मिळावे यासाठी प्रशासनाने तातडीने स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी साताऱ्यातील नागरिकांकडून होत आहे.

## ताम्हिणी घाटात कार कोसळून तरुणाचा जागीच मृत्यू

**पुणे, ता. ३ :** ताम्हिणी घाटात पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली आहे. काही आठवड्यांपूर्वी पुण्यातील सहा तरुणांचा मृत्यू झालेल्या ठिकाणाजवळच मंगळवारी आणखी एका वाहनाचा अपघात झाला. माणगाव हद्दीत हुंडई ऑरा ही कार खोल दरीत कोसळून चालकाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून ताम्हिणी घाटातील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.




मंगळवारी दुपारच्या सुमारास ही कार ताम्हिणी घाटातून जात असताना अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कार थेट सुमारे ७०० ते ८०० मीटर खोल दरीत कोसळली. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की कार पूर्णपणे चिरडली गेली. दरी अतिशय खोल आणि दुर्गम असल्याने बचाव कार्यात अडचणी आल्या. पोलिस आणि स्थानिक बचाव पथकांनी ड्रोनच्या मदतीने वाहनाचा आणि चालकाचा शोध घेतला. या अपघातात शुभम असे मृत चालकाचे नाव असून तो पुण्याचा रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. शुभम हा गाडी चालवत असताना अपघातग्रस्त झाला आणि वाहनाच्या तुटलेल्या अवशेषांमध्ये अडकून पडला होता. त्याला वाचवणे शक्य झाले नाही. अपघातानंतर त्याचा मृतदेह मोठ्या प्रयत्नांनी दरीतून बाहेर काढण्यात आला.

माणगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी सांगितले की, शुभम हा पुण्याहून येत होता. तो नेमका कुठे जात होता आणि अपघात कसा झाला याबाबत सध्या स्पष्ट माहिती मिळालेली नाही. संबंधित कारकडे पर्यटन परवाना असल्याने तो ड्रायव्हिंग व्यवसाय करत असावा, असा प्राथमिक अंदाज आहे.

ताम्हिणी घाटात यापूर्वीही अशा अपघातांच्या घटना घडल्या आहेत. अरुंद रस्ते, तीव्र वळणे आणि सुरक्षिततेच्या अपुऱ्या उपाययोजनांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे स्थानिक नागरिक सांगतात. या घटनेनंतर घाटातील वाहतूक सुरक्षेबाबत ठोस पावले उचलण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

## पुण्यात पंतगासाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे ४ महिलांचे गळे कापले

**पुणे, ता. ३ :** पिंपरी-चिंचवडमधील बोपखेल परिसरात पतंगासाठी वापरल्या जाणाऱ्या जीवघेण्या मांजामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. गेल्या तीन दिवसांत या मांजामुळे चार महिला जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. नवनिर्मित बोपखेल पुलावर ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, एका महिलेच्या गळ्याला खोल जखम झाल्याने परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण आहे. प्रशासन सध्या निवडणुकीच्या कामात गुंतल्यामुळे अवैध मांजा विक्रीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.



बोपखेल पुलावरून दुचाकीवरून प्रवास करत असताना वाऱ्यामुळे उडून आलेला मांजा अचानक अंगाला अडकत असल्याच्या घटना घडत आहेत. या मांजामुळे चार महिलांच्या हाताला आणि गळ्याला जखमा झाल्या आहेत. यातील अर्चना पवार या महिलेच्या गळ्याला गंभीर काप लागल्याने त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी वेळीच उपचार केल्यामुळे त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. अवघ्या ७२ तासांत घडलेल्या या घटनांमुळे दुचाकीस्वारांमध्ये भीती पसरली आहे.

खडकी, दापोडी आणि आसपासच्या भागात नायलॉन आणि चिनी मांजाची खुलेआम विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. या मांजावर बंदी असतानाही तो बाजारात सहज मिळतो, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. पोलिसांकडून केवळ घटनांची नोंद घेतली जाते, मात्र मूळ विक्रेत्यांवर ठोस कारवाई होत नसल्याने धोका कायम आहे. पुलावर अडकलेले तुटलेले पतंग आणि लोंबकळणारे मांजे दुचाकीस्वारांसाठी फास ठरत आहेत.

या प्रकारामुळे एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अवैध मांजा विक्रेत्यांविरोधात विशेष मोहीम राबवावी, तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी बोपखेल परिसरातील नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## कुंबळजाई देवीचा यात्रा उत्साहात संपन्न

विशाल शिंदे

पुणे, ता. ३ : भोर तालुक्यातील कुंबळे गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही ग्रामदैवत कुंबळजाई देवीचा वार्षिक यात्रा उत्सव १ व २ जानेवारी रोजी अत्यंत मंगलमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. दोन दिवस चाललेल्या या यात्रेत धार्मिक, सांस्कृतिक तसेच क्रीडा कार्यक्रमांची मोठी रेलचेल पाहायला मिळाली.

यात्रेनिमित्त कुंबळजाई देवीची विधीवत पूजा, अभिषेक व महाआरती करण्यात आली. मंदिर परिसरात करण्यात आलेली आकर्षक रोषणाई भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. गावासह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने देवीचे दर्शन घेतले. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सायंकाळी व रात्री आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी यात्रेला रंगत आणली. पारंपरिक गीत-संगीत, लोककला यांचा आनंद ग्रामस्थांनी मनसोक्त घेतला.



या यात्रेचे मुख्य आकर्षण ठरले ते कुस्तीचे जंगी मैदान. या मैदानात पंचक्रोशीतील तसेच राज्यातील नामवंत राष्ट्रीय मल्लांनी सहभाग घेतला. कुस्तीप्रेमींची मोठी गर्दी या मैदानावर उसळली होती. चित्तथरारक आणि अटीतटीच्या कुस्त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कुस्ती मैदानासाठी राष्ट्रीय मल्ल व प्रसिद्ध पंच वस्ताद तुषार गोळे आणि लखन पवार (वेल्हे) यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या कुस्त्यांमुळे खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. कुंबळे गावच्या या पारंपरिक यात्रेत आबालवृद्धांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

यात्रेचे नियोजन कुंबळे ग्रामस्थ व यात्रा कमिटीच्या वतीने अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. शांतता, शिस्त व सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्याने यात्रा कोणताही अनुचित प्रकार न घडता यशस्वीरीत्या पार पडली. या उत्सवामुळे संपूर्ण परिसरात भक्तीमय व आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.



# सोमेश्वरनगर येथे तरुणाचे अपहरण करून बेदम मारहाण; चार जणांना अटक

**पुणे, ता. ३ :** बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर परिसरात जमिनीच्या वादातून एका तरुणाचे अपहरण करून त्याला बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलिसांनी मुख्य सूत्रधारासह चार जणांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांची रवानगी येरवडा कारागृहात केली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

ही घटना २२ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडली. फिर्यादी संदीप गोरख होळकर, रा. सदोबाचीवाडी, हे वडगाव निंबाळकर येथील एका हॉटेलसमोर उभे असताना आरोपी तेथे आले. त्यांनी संदीप यांना बळजबरीने पांढऱ्या रंगाच्या स्वीफ्ट कारमध्ये बसवले आणि अपहरण करून पळवून नेले. जमिनीच्या वादातून निर्माण झालेल्या रागातून मुख्य आरोपी



तेजस ऊर्फ बंटी होळकर याने आपल्या साथीदारांच्या मदतीने संदीप यांना मावळ तालुक्यातील उर्से येथील एका उसाच्या शेतात नेले.

त्या ठिकाणी आरोपींनी संदीप यांना लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. मारहाण सुरू असतानाच आरोपी बंटी होळकर याने फरार आरोपी शंभू कारंडे याला व्हिडिओ कॉल करून संदीप यांना होत असलेली मारहाण थेट दाखवली. तसेच आमच्या नादाला लागलास तर जिवे मारू, अशी धमकी देण्यात आली. मारहाणीनंतर संदीप यांना दारू पाजून जखमी अवस्थेत बारामतीतील होळ परिसरात सोडून आरोपी फरार झाले.

घटनेनंतर वडगाव निंबाळकर पोलिसांनी तक्रार दाखल करून तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तेजस होळकर, साहिल गायकवाड, संकेत भिसे आणि सनी सकट या चार आरोपींना अटक करण्यात आली. गुन्ह्यात वापरलेली कार आणि लाकडी दांडके पोलिसांनी जप्त केली आहेत. सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून त्यांची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# सिंधुदुर्ग विमानतळाला डीजीसीएची सर्वकालीन हवामानात विमान चालवण्याची मान्यता

**अमित मुंडीक**

सिंधुदुर्ग, ता. ३ : आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडद्वारे संचालित चिपीपरुळे येथील सिंधुदुर्ग विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने २४७ सर्वकालीन हवामानात विमानचालनासाठी मान्यता दिली आहे. या मान्यतेमुळे सिंधुदुर्ग विमानतळावर आता दिवस-रात्र तसेच प्रतिकूल हवामानातही विमानसेवा सुरळीतपणे चालवता येणार आहे. या मंजुरीमुळे सिंधुदुर्ग विमानतळ इन्स्ट्रुमेंट फ्लाइट रूल्स अंतर्गत प्रमाणित झाला असून, कमी दृश्यमानता आणि खराब हवामानातही सुरक्षित विमान लँडिंग व उड्डाण शक्य होणार आहे.




यामध्ये उपग्रह-आधारित आवश्यक नेव्हिगेशन परफॉर्मन्स प्रणाली आणि नॉन-सॅटेलाइट बॅकअप नेव्हिगेशन सुविधांचा समावेश आहे, ज्यामुळे वैमानिकांना अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह मार्गदर्शन मिळणार आहे.

प्रवाशांच्या वाढत्या वर्दळीच्या पार्श्वभूमीवर ही मान्यता अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. डिसेंबर महिन्यात प्रथमच जवळपास ११ हजार प्रवाशांची वर्दळ सिंधुदुर्ग विमानतळावर नोंदवण्यात आली असून, मासिक प्रवासी संख्येनुसार हा विमानतळ लवकरच देशातील टॉप ७५ विमानतळांमध्ये स्थान मिळवेल, अशी अपेक्षा आहे.

वाढत्या वाहतुकीचा विचार करून विमानतळाची पार्किंग क्षमता दुप्पट करण्यात आली असून, आता एकाचवेळी सहा विमाने पार्क करता येणार आहेत. यामुळे कोकण प्रदेशासाठी भविष्यातील महत्त्वपूर्ण विमान वाहतूक प्रवेशद्वार म्हणून सिंधुदुर्ग विमानतळाचे स्थान अधिक भक्कम झाले आहे.

यावेळी बोलताना आयआरबी सिंधुदुर्ग विमानतळाचे मुख्य सल्लागार व प्रमुख कॅप्टन जय एस. सदाना म्हणाले की, २४७ सर्वकालीन हवामानात कामकाजासाठी मिळालेली मान्यता ही विमानतळाच्या कार्यक्षमतेत आणि विश्वासार्हतेत मोठी वाढ करणारी आहे. यामुळे विमान कंपन्यांचा आत्मविश्वास वाढेल तसेच कोकणातील पर्यटन आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल.

दरम्यान, कुडाळपासून २१ किमी आणि गोवा (मोपा) विमानतळापासून ५६ किमी अंतरावर असलेला सिंधुदुर्ग विमानतळ कोकण पट्टा आणि दक्षिण गोव्यासाठी महत्त्वाचे प्रवेशद्वार ठरत असून, आधुनिक पायाभूत सुविधांसह प्रादेशिक विकासाचा प्रमुख केंद्रबिंदू म्हणून उदयास येत आहे.

# येवलेवाडी खुन प्रकरणातील आरोपींना अवघ्या १२ तासाच्याआत अटक

**अमित मुंडीक**

पुणे, ता. ३ : पुणे शहरातील येवलेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत जुन्या भांडणाच्या वैमनस्यातून एका तरुणाचा निघृण खून केल्याची घटना उघडकीस आली असून, या गंभीर गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या १२ तासांत अटक करत येवलेवाडी पोलिसांनी धडाकेबाज कामगिरी केली आहे.

येवलेवाडी कमानीच्या पुढे, मिनू मेहता सोसायटीकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर आकाश कृष्णा चाबुकस्वार (वय २१, रा. फुरसुंगी, पुणे) याचा रस्ता अडवून जुन्या भांडणाच्या कारणावरून वाद घालण्यात आला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून एकूण सात आरोपींनी आकाश चाबुकस्वार यास लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून




त्याच्या डोक्यात दगड घालून अत्यंत निघृणपणे खून केला.

या प्रकरणी येवलेवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), १८९(२), १९०, १९१(२) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) व १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गंभीर गुन्हा करून आरोपी फरार झाल्याने मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-५ यांच्या आदेशानुसार तात्काळ दोन तपास पथके तयार करण्यात आली.


तपास पथकातील सहायक पोलीस निरीक्षक राकेश जाधव व पोलीस अंमलदार सुजीत मदन यांनी गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी नामे आदित्य सुभाष गायकवाड (वय १९, रा. गोकुळनगर, कोंढवा), गणेश किशोर मोरे (वय २०, रा. कात्रज-कोंढवा) आणि कौशल्य उर्फ ऋषी जनार्धन मारे (वय १९, रा. तुळजाभवानी निवास, कोंढवा) यांना तात्काळ ताब्यात घेतले आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

ही कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) मनोज पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-५ राजलक्ष्मी शिवणकर, सहायक पोलीस आयुक्त वानवडी विभाग नम्रता देसाई तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमर काळंगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या यशस्वी कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक राकेश जाधव यांच्यासह येवलेवाडी पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांनी मोलाची भूमिका बजावली.

# पुणे रिंगरोडचे २० टक्के काम फत्ते; वाहतूक कोंडीतून सुटका होण्यासाठी 'डेडलाईन' ठरली

**पुणे, ता. ३ :** राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सुरू असलेल्या पुणे बाह्य रिंगरोडच्या कामाची सध्या सुमारे २० टक्के प्रगती झाली आहे. मुख्यत्वे पश्चिम टप्प्याचे काम वेगाने सुरू असून, पुढील दोन वर्षांत हा टप्पा पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली. याचबरोबर पूर्व टप्प्याचे कामही सुरू झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, रिंगरोडच्या ३१ किलोमीटर लांबीच्या कामासाठी नव्याने निविदा काढण्यात आल्या असून, लवकरच त्या कामाचे आदेश दिले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांतील वाढती वाहतूक कोंडी कमी



करण्यासाठी एमएसआरडीसीकडून हा रिंगरोड प्रकल्प राबवण्यात येत आहे. हा प्रकल्प पूर्व आणि पश्चिम अशा दोन टप्प्यांत विभागण्यात आला आहे. सध्या पश्चिम टप्प्यातील काम सुमारे २० टक्के पूर्ण झाले आहे. पावसाळा संपल्यानंतर कामाचा वेग वाढला असून, मे अखेरपर्यंत महत्त्वाची कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पश्चिम टप्प्याचे काम पूर्ण करण्यासाठी डिसेंबर २०२७ अखेरची मुदत देण्यात आली असून, त्या कालावधीत हा टप्पा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

पूर्व टप्प्याचे काम पूर्ण करण्यासाठी मे २०२८ पर्यंतची मुदत निश्चित करण्यात आली आहे. त्या वेळेपर्यंत संपूर्ण रिंगरोड पूर्ण करून तो वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असे वसईकर यांनी सांगितले. पूर्वेकडील टप्प्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून पुणे ते संभाजीनगरदरम्यान ग्रीन कॅरिडोरचे काम सुरू आहे. या ग्रीन कॅरिडोरचा आणि रिंगरोडचा मार्ग काही ठिकाणी एकत्र येत असल्यामुळे नगर रस्त्यापासून सोलापूर रस्ता आणि पुढे पुणे-बंगळूर रस्त्याला जोडणाऱ्या रिंगरोडच्या ३१ किलोमीटर रस्त्याचे काम प्राधिकरणाने करावे, असा आधी निर्णय झाला होता.

मात्र, नंतर प्राधिकरणाने आपला निर्णय बदलत हे काम पुन्हा राज्य रस्ते विकास महामंडळानेच करावे, अशी सूचना दिली. त्यानुसार आता या कामासाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवण्यात येत असून, येत्या काळात या टप्प्यालाही गती मिळण्याची शक्यता आहे.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# देवा शप्पथ सांगतो; पैलवानाच्या नादाला लागयचं नसतं!

## रविंद्र चव्हाण यांचा इशारा; अजित पवार स्क्रीप्टवर बोलू नका!



**पिंपरी-चिंचवड, ता. ३ :** पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांनी पत्रकार परिषद घेतली आणि स्क्रिप्टच्या आधारे एजन्सीच्या सल्ल्याने बिनबुडाचे आरोप केले. त्यांच्या काळात शहरात काय झाले आणि भाजपाच्या सत्ताकाळात काय विकासकामे केली हे आम्ही सांगतो. पण, देवा शप्पथ सांगतो; पैलवानाच्या नादाला लागू नका.. असा इशारा भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव न घेता दिला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक- २०२६ च्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीने निगडी येथील भक्ती-शक्ती शिल्पाजवळ आयोजित कार्यक्रमात निवडणुकीच्या प्रचाराचा शुभरंभ केला. यावेळी चव्हाण बोलत होते. या प्रसंगी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महामंत्री राजेश पांडे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे यांच्यासह शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भोसरी विधानसभेतील भरत लांडगे, शिवसेना उबाठा पिंपरी-चिंचवड शहर संघटक संतोष वाळके, उपविभाग प्रमुख अविनाश लोणारे, भाऊसाहेब काटे, भोसरी विधानसभा समन्वयक साईनाथ ढाकणे, मनोज परांडे, राजकुमार बांगर, शाखाप्रमुख प्रिमशिल पोटभरे, सचिन नायकुडे, सुभाष खेडकर, नवनाथ परांडे, पंडित वाळके, बापुशेठ परांडे, नितीन परांडे, पप्पु तुपे, चेतन कदम, संकेत परांडे, शुभम वाळके, ऋत्विक कदम, अमित सोरटे, सुदर्शन कदम, अजय काळे, प्रदीप परांडे, किरणशेठ वाळके, अजय परांडे, निलेश वाळके यांच्यासह राष्ट्रवादीचे अनवर शेख, गणेश सानप, संतोष फुंदे, रविंद्र राख, सरचिटणीस अजहर खान, सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष गंगाताई धेंडे, कायदा सेलचे ॲड. विशाल जाधव, ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष गणेश सस्ते, गणेश यादव, महिला आघाडीच्या शुभांगी जाधव आदींनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे.

> भारतीय जनता पार्टीची विचारधारा राष्ट्र प्रथम म्हणून काम करीत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकांची दिशाभूल करणाऱ्यांना पिंपरी-चिंचवडकर भुलणार नाहीत. वर्षानुवर्षे त्यांनी केलेला कारभार पिंपरी-चिंचवडकरांनी पाहिला आहे. शहर स्मार्ट करण्यासाठी, मेट्रो सिटी घडवण्यासाठी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभा केले पाहिजे. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात याचा विचार केला नाही आणि आज वर तोंड करुन बोलत आहेत. हिंदुत्वाचं नाव घ्यायला घबारताहेत. हिंदुत्वाचे नाव घ्यायला अंगत रग लागते. ती भाजपाशिवाय कोणाकडेही नाही.
>
> - **रविंद्र चव्हाण,** प्रदेशाध्यक्ष, भाजपा

### खोटा नॅरेटिव्ह करण्याचा प्रयत्न

रविंद्र चव्हाण म्हणाले की, भाजपाचा कार्यकर्ता कायम लोकांच्या सेवेत आहे. सेवेतून संघटन आम्ही पुढे नेत आहोत. केंद्र व राज्य सरकारने सातत्याने लोकहिताचे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे मोदी सरकार, फडणवीस सरकारला लोकप्रियता मिळाली आहे. लोकसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे खोटा नॅरेटिव्ह केला. तसा आता काहीलोक महापालिका निवडणुकीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. काही लोकांना एजन्सीज् स्क्रिफ्ट लिहून देतात. एजन्सीज भाड्याने घ्यायच्या आणि पैसा जक्कड आहे. त्यामुळे हजार-दोन हजार लोकांना कंपन्यांमध्ये बसवून ट्रोल करायला पैसे द्यायचे. मी किती पॉप्युलर आहे, हे दाखवण्यासाठी काहीपण करायला लोक तयार आहेत, असा घणाघातही चव्हाण यांनी केला.

# निष्पक्ष, पारदर्शक निवडणुकीच्या मुख्य निवडणूक निरीक्षक राहुल महिवाल यांच्या सूचना

**अमित मुंडीक**



पुणे, ता. ३ : पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक निरीक्षक राहुल महिवाल (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी दुपारी साडेचार वाजता पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहात आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागातील निवडणूक विषयक कामकाजाची सद्यस्थिती मांडली, तर सर्व प्रभागांचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे अद्ययावत माहिती सादर केली. यावेळी मुख्य निवडणूक निरीक्षक राहुल महिवाल यांनी निवडणूक तयारीबाबत समाधान व्यक्त करत, निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक व शांततेत पार पडणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

आचारसंहिता भंगाच्या संदर्भात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीवर निष्पक्ष व तातडीने कार्यवाही करावी, तक्रारींची गांभीर्याने दखल घ्यावी, तसेच उपद्रवी घटनांवर तत्काळ नियंत्रण मिळवावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. विशेषतः रात्रीच्या वेळेस आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये यासाठी एफएसटी, एसएसटी व व्हीएसटी पथकांमार्फत कार्यवाही अधिक प्रभावी करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच स्वीप उपक्रम, आचारसंहिता अंमलबजावणी आणि आयोगाच्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी निवडणूक निरीक्षक अरुण आनंदकर यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, कक्षप्रमुख, पुणे महानगरपालिकेचे अधिकारी, पोलीस आयुक्त (पुणे व पिंपरी-चिंचवड), आयकर आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांनी परस्पर समन्वय राखून निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडावी, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

या बैठकीस निवडणूक निरीक्षक अरुण आनंदकर, अपर जिल्हाधिकारी, अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे, तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, निवडणूक व्यवस्थापनाशी संबंधित सर्व कक्षप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

# गिलला अचानक संघातून वगळलं

**पुणे, ता. ३ :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यात लवकरच एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी आज भारताचा एकदिवसीय संघ जाहीर होणार आहे. पण संघ जाहीर होण्याआधीच एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. त्यामुळे एकदिवसीय संघाचं नेतृत्व पुन्हा केएल राहुलकडे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सध्याचा एकदिवसीय कर्णधार शुभमन गिल अजून पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याची माहिती मिळतेय. विजय हजारे ट्रॉफीमध्ये सिक्कीमविरुद्ध खेळून तो मैदानात परतणार होता, पण प्रत्यक्षात तो सामना खेळू शकला नाही. पंजाबकडून खेळण्याची तयारी असतानाच सामन्याआधी गिल आजारी पडला आणि त्याला बाहेर बसावं लागलं.

मिळालेल्या माहितीनुसार, शुभमन गिलला अन्नातून विषबाधा झाली होती. त्यामुळे त्याला लगेच खेळण्याचा धोका न घेता विश्रांती देण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबत अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. तो शुक्रवारी रात्री चंदीगडहून जयपूरला पोहोचला असून आता ६ जानेवारी रोजी गोवाविरुद्ध होणाऱ्या पुढील सामन्यात तो खेळेल अशी अपेक्षा आहे.

गिल आजारी असल्याची बातमी अशा वेळी आली आहे, जेव्हा भारत-न्यूझीलंड एकदिवसीय मालिकेसाठी संघ जाहीर होणार आहे. त्यामुळे तो या मालिकेसाठी फिट होईल की नाही, याबाबत शंका निर्माण झाली आहे.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, शुभमन गिलला गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये भारताच्या एकदिवसीय संघाचा कर्णधार बनवण्यात आलं होतं. पण त्यानंतर दुखापती आणि आरोग्याच्या समस्यांमुळे तो फारसे सामने खेळू शकलेला नाही.

# अर्ज माघारी घेणाऱ्या उमेदवारांची कडक चौकशी करणार : निवडणूक आयोग




**मुंबई, ता. ३ :** आगामी नागरी निवडणुकांमध्ये काही ठिकाणी सत्ताधारी पक्षांचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी केलेल्या गंभीर आरोपांची चौकशी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग करणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव, प्रलोभन किंवा जबरदस्तीचा वापर झाला का, याबाबत आयोगाने संबंधित महानगरपालिकांकडून सविस्तर अहवाल मागवले आहेत.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी होणार असून मतमोजणी १६ जानेवारीला पार पडणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० डिसेंबर होती. या प्रक्रियेनंतर काही महानगरपालिकांमध्ये बिनविरोध निवडी झाल्याचे समोर आले आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत भाजपचे ५ आणि शिवसेनाचे ४ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. तसेच पिंपरी-चिंचवड, जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर येथेही किमान १ भाजप उमेदवार बिनविरोध निवडून आल्याची माहिती आहे.

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, संबंधित प्रभागातील निवडणूक अधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागवले जाणार आहेत. हे अहवाल प्राप्त होईपर्यंत बिनविरोध निवडीची अधिकृत घोषणा करण्यास निवडणूक अधिकाऱ्यांना परवानगी दिली जाणार नाही. चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, काँग्रेस, जनता दल आणि आम आदमी पक्ष यांनी मुंबईतील कुलाबा परिसरातील काही प्रभागांमध्ये उमेदवारांवर दबाव टाकून बेकायदेशीर पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून रोखण्यात आल्याचा आरोप केला आहे. या आरोपांमुळे राज्यातील नागरी निवडणुकांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आयोगाच्या चौकशीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जमीन घोटाळा प्रकरणी ॲड. सी.आर. सांगलीकरांना अटक



**पुणे, ता. ३ :** मिरजेतील उद्योजक आणि राजकीय कार्यकर्ते ॲड. चंद्रकांत रामचंद्र ऊर्फ सी.आर. सांगलीकर यांना पिंपरी-चिंचवड येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिरजेतून अटक केली आहे. बावधन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या सुमारे २७ कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या गुन्ह्याप्रकरणी मंगळवारी ही कारवाई करण्यात आली. या अटकेमुळे सांगलीसह पुणे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पांडुरंग पवार यांनी १८ नोव्हेंबर रोजी तक्रार दिल्यानंतर ॲड. सांगलीकर आणि त्यांच्या इतर चार साथीदारांविरोधात बावधन पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पुढे पिंपरी-चिंचवड आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला. पीएसीएल कंपनीची तसेच सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या लोढा समितीच्या ताब्यात असलेली मौजे सुस, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील ३३ एकर जमीन बेकायदेशीररीत्या विक्री केल्याचा आरोप आहे. या जमिनीची किंमत सुमारे २७ कोटी ९१ लाख ९० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या व्यवहारातून पीएसीएलमधील गुंतवणूकदार आणि शासनाची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ॲड. सांगलीकर सध्या मिरज परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी मिरजेत छापा टाकला आणि त्यांना ताब्यात घेतले. अटकेनंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना ५ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या काळात अधिक तपास करून इतर आरोपींची भूमिका स्पष्ट केली जाणार आहे.

ॲड. सी.आर. सांगलीकर यांनी २०१४ मध्ये मिरज विधानसभा निवडणूक लढवली होती. मागील निवडणुकीत काँग्रेसकडून उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी खासदार विशाल पाटील यांच्यावर टीका केली होती, त्यामुळे ते चर्चेत आले होते. सध्या सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या अटकेमुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे.

## प्राईम लाईफ



# वारंवार भूक लागतेय? आहारात करा 'हे' बदल

प्रत्येक २ तासांनी भूक लागणे ही समस्या आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेकांना जाणवते. याला वैद्यकीय भाषेत 'हायपरफॅगिया' किंवा 'पॉलिफॅगिया' असंही म्हणतात. जर तुम्हालाही दर तासांनी भूक लागत असेल, तर त्यामागील कारणे आणि उपाय खालीलप्रमाणे आहेत:

वारंवार भूक का लागते? (मुख्य कारणे) : प्रोटीन आणि फायबरची कमतरता: जर तुमच्या आहारात प्रोटीन (प्रथिने) आणि फायबर (तंतूमय पदार्थ) कमी असतील, तर अन्न लवकर पचते आणि लवकर भूक लागते.

पाण्याचे कमी प्रमाण : अनेकदा शरीराला तहान लागलेली असते, पण आपला मेंदू तो भुकेचा संकेत समजतो. यामुळे आपण गरजेपेक्षा जास्त खातो.

अपुरी झोप : झोप पूर्ण न झाल्यास शरीरातील 'घ्रेलिन' (भूक वाढवणारे संप्रेरक) वाढते आणि 'लेप्टिन' (पोट भरल्याची जाणीव करून देणारे संप्रेरक) कमी होते.

मानसिक ताण : तणावामुळे शरीरात 'कॉर्टिसोल' हार्मोन वाढते, ज्यामुळे सतत काहीतरी खाण्याची इच्छा होते.

वैद्यकीय कारणे : मधुमेह, थायरॉईड किंवा पोटातील जंत यामुळेही वारंवार भूक लागू शकते.

रक्तातील साखरेचे चढ-उतार : अति गोड किंवा मैद्याचे पदार्थ खाल्ल्याने रक्तातील साखर वेगाने वाढते आणि तितक्याच वेगाने कमी होते, ज्यामुळे पुन्हा भूक लागते.

काय करावे? (उपाय आणि आरोग्य टिप्स) : जर तुम्हाला दर तासांनी भूक लागत असेल, तर जीवनशैलीत खालील बदल करा:

आहारात बदल करा : प्रोटीनयुक्त नाश्ता : सकाळी अंडं, मोड आलेली कडधान्ये, पनीर किंवा सोयाबीन यांसारखे प्रोटीनयुक्त पदार्थ खा. यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते.

फायबर वाढवा : जेवणात पालेभाज्या, फळे आणि ओट्स यांचा समावेश करा.

मैदा आणि साखर टाळा : बिस्किटे, व्हाईट ब्रेड आणि मिठाई खाणे कमी करा.

पाणी पिण्याची सवय लावा : भूक लागली की आधी एक ग्लास पाणी प्या. १०-१५ मिनिटांनंतरही भूक वाटली, तरच काहीतरी खा. दिवसभरात किमान ३-४ लिटर पाणी प्या.

पुरेशी झोप आणि व्यायाम : रोज ७-८ तासांची शांत झोप घ्या. तसेच, नियमित व्यायाम केल्याने चयापचय सुधारते आणि भुकेवर नियंत्रण राहते.

'स्मार्ट स्नॅकिंग' करा : जर २ तासांनी भूक लागलीच, तर तळलेले पदार्थ खाण्याऐवजी मखाणे, सुका मेवा (बदाम, अक्रोड), उकडलेले चणे किंवा एखादे फळ खा.

डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा?

जर आहार सुधारून आणि पुरेसे पाणी पिऊनही तुमची भूक कमी होत नसेल, किंवा सोबत खालील लक्षणे दिसत असतील, तर डॉक्टरांना नक्की भेटा:

- अति तहान लागणे.
- सतत लघवीला होणे.
- खाऊनही वजन कमी होणे.
- सतत थकवा जाणवणे.

वारंवार लागणारी भूक ही केवळ खाण्याची इच्छा नसून ते तुमच्या शरीराने दिलेले एक महत्त्वाचे संकेत असू शकतात. संतुलित आहार, वेळेवर झोप आणि पुरेशा पाणी पिण्यासारख्या साध्या सवयी बदलून तुम्ही या समस्येवर नियंत्रण मिळवू शकता. मात्र, जर हे बदल करूनही भूक शमत नसेल, तर त्याकडे दुर्लक्ष न करता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे केव्हाही हिताचे ठरेल.

# पुणे मुंबई रिर्टनचा प्रवास बुलेट ट्रेनने ६० मिनिटांत होणार

**पुणे, ता. ३ :** देशातील पहिली बुलेट ट्रेन लवकरच धावणार आहे. नवीन वर्षाच्या निमित्ताने, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुलेट ट्रेनबाबत मोठी अपडेट दिली. १५ ऑगस्ट २०२७ पर्यंत भारताला पहिली बुलेट ट्रेन धावणार आहे. बुलेट ट्रेनच्या कामाची अपडेट देताना रेल्वे मंत्र्यांनी याचे तिकीट दर किती असतील याची देखील घोषणा केली. ३२० KM प्रतितास इतका महाप्रचंड स्पीडने ही बुलेट ट्रेन धावणार आहे. मुंबई ते अहमदाबाद हा संपूर्ण हाय-स्पीड कॉरिडॉर कार्यान्वित होईल. रेल्वेमंत्र्यांनी हलक्या स्वरात लोकांना आतापासूनच तयारी करण्याचे आवाहन केले. दरम्यान, या ट्रेनचा स्पीड पाहिला असता मुंबई पुणे मार्गावर ही बुलेट ट्रेन धावली असती तर मुंबई पुणे रिर्टन प्रवास ६० मिनिटांत झाला असता. मुंबई ते पुणे १५५ KM इतके अंतर आहे. या प्रवासासाठी रेल्वे तसेच हायवेने गेल्यास ४ तासांचा सध्या वेळ लागतो.

# महायुतीचे ६८ नगरसेवक मतदानापूर्वीच विजयी; भाजप-शिवसेनेचा बोलबाला




**पुणे, ता. ३ :** सध्या सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये भाजप आणि महायुतीने जोरदार मुसंडी मारत बिनविरोध नगरसेवकांच्या बाबतीत आघाडी घेतली आहे. उपलब्ध माहितीनुसार भाजप आणि महायुतीचे एकूण ६८ नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून, महापालिकांच्या पातळीवर भाजपाने नवा विक्रम केल्याचे चित्र दिसत आहे. या निवडणुकांमध्ये भाजपाचे सर्वाधिक नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याने पक्षाची ताकद अधोरेखित झाली आहे.

महापालिका निवडणुकांच्या सद्य टप्प्यात भाजपाचे ८ महापालिकांमध्ये एकूण ४४ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. यामध्ये कल्याण-डोंबिवली महापालिकेचा प्रामुख्याने समावेश असून, येथे सर्वाधिक नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. याशिवाय पुणे, पिंपरी-चिंचवड, पनवेल, भिवंडी, धुळे, जळगाव आणि अहिल्यानगर या महापालिकांमध्येही भाजपाचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याची माहिती आहे. अनेक प्रभागांमध्ये विरोधकांनी अर्ज मागे घेतल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.

राज्यातील या राजकीय यशामागे देवेंद्र फडणवीस यांची लोकप्रियता आणि रविंद्र चव्हाण यांची संघटनात्मक रणनीती कारणीभूत ठरत असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. नगरपालिका निवडणुकांनंतर आता महापालिकांमध्येही भाजप क्रमांक एकचा पक्ष ठरू लागल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

दरम्यान, भाजपानंतर शिवसेनाचे २२ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे २ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याची माहिती आहे. बिनविरोध निवडींच्या या आकडेवारीमुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात भाजप आणि महायुतीची पकड अधिक मजबूत झाल्याचे दिसून येत आहे.

# भाजपने श्रीमंत महापालिकेला कर्जबाजारी केले! अजित पवारांचा थेट हल्लाबोल



**पिंपरी, ता. ३ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांवर जोरदार टीका केली. अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर शुक्रवारी पिंपरीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष योगेश बहल, माजी आमदार विलास लांडे, प्रचार प्रमुख नाना काटे, अजित गव्हाणे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले की, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे चिरंजीव आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सिद्धार्थ बनसोडे यांच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा आरोप करण्यात आला होता, मात्र तो सिद्ध झाला नाही. त्याचप्रमाणे माझ्यावर जलसंपदा विभागात ७० हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप झाला होता, तोही सिद्ध झाला नाही. ज्यांनी माझ्यावर एवढ्या मोठ्या घोटाळ्याचे आरोप केले, त्यांच्यासोबतच मी आज सत्तेत सहभागी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार असले तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढत आहे. पिंपरी-चिंचवड शहराशी माझे नाते १९९१ पासून आहे. त्या वेळी शहराने मला खासदार म्हणून निवडून दिले. त्यानंतर शहराच्या विकासकामांना गती मिळाली. २०१७ पर्यंत महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती. त्या काळात अनेकांना पदे दिली, तरी काही जणांनी पक्ष सोडला, असा आरोप त्यांनी केला.

भाजपवर टीका करताना अजित पवार म्हणाले की, आशिया खंडातील श्रीमंत महापालिका असा पिंपरी-चिंचवडचा गौरव होता. राष्ट्रवादी काँग्रेसच्या काळात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली, मात्र महापालिकेला कधीही कर्जबाजारी केले नाही. भाजपच्या काळात मात्र महापालिकेच्या ठेवी कमी झाल्या. विकास दाखवण्यासाठी ठेवी मोडल्या गेल्या आणि कर्जरोखे काढण्यात आले. चांगले रस्ते पुन्हा उखडून कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. त्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली रस्त्यांची अवस्था खराब करण्यात आली. फुटपाथवर अतिक्रमण करून हप्तेवसुली होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. वाहनतळांची योग्य व्यवस्था करण्यात आलेली नाही. निविदांमध्ये रिंग करून रक्कम फुगावली जाते, याचे पुरावे आमच्याकडे आहेत, असा दावा त्यांनी केला. श्वान नसबंदी प्रकरणातही भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत, मागील वर्षांत २० हजार नागरिकांना श्वान चावल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. सध्या महापालिकेत मोठ्या प्रमाणावर गैरकारभार सुरू असल्याचा आरोप करत अजित पवार यांनी भाजपवर निशाणा साधला.